# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पिंपरी-चिंचवड **P.S.(ठाणे):** देहु रोड
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0173 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**06/06/2026 03:55

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिंनाक पासून):** 05/06/2026
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिंनाक पर्यंत):** 05/06/2026
**Time From (वेळेपासून):** 15:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:48 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 06/06/2026 **Time (वेळ):** 03:40 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 005
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 06/06/2026 03:40 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 6 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** भैरवनाथ चौक येथे रामकष्ण ,मेडीकल स्टोअर्सच्या जवळ देहूगा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** भारती मोरे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1975

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग पुणे,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग पुणे,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9870156586

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | गजानन बाळासाहेब चट्टे | | | 1. मिडास रिजनशी फलट न 609, विठ्ठलवाडी देहू बाय पास रोड , देहूगाव, ता खेड जिपुणे,देहु रोड, पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 2,00,000/ रूपये (50,000 | 200,000.00 |



Scanned with CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | रूपये 500 रू दराच्या भारतीय चलनी नोटा व 1,50,000 रूपये खेळण्यातील नकली नोटा | |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

200,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

गु.रजि.नं.व कलम:- 173/2026, भ्रष्टाचार प्रतिंबधक अधिनियम कलम 7 प्रमाणे

मी भारती मोरे, वय-51 वर्षे व्यवसाय नोकरी,पद-पोलीस उप-अधीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग पुणे मो.नं. 9870156586

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिंबधक विभाग पुणे येथे पोलीस उप-अधीक्षक म्हणुन कार्यरत आहे. दि. 05/06/2026 रोजी मी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग ,पुणे येथे हजर असताना प्रशासन अधिकारी श्री. दयानंद गावडे, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी तक्रारदार श्री. तानाजी रामचंद्र ससाणे यांची लाच मागणी होत असले बाबतची तक्रार असून त्याप्रमाणे पुढील कायदेशीर कारवाई करा असे सांगुन त्यासाठी पथक तसेच गोपनिय कारवाई कामी राखीव असलेले पंच 1) घनशाम गोरखनाथ गोरे, पद- कनिष्ठ अभियंता, लघु पाठबंधारे विभाग, जिल्हा परिषद, पुणे 2) सागर मुकूंद उबाळे, पद- परिचर, सामन्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, पुणे हे पंच उपलब्ध करुन दिले. सदर पंचासमक्ष तक्रारदार यांॆनी तक्रार प्रथम तोंडी कथन करुन लेखी तक्रार दिली.

तक्रारदार श्री. तानाजी रामचंद्र ससाणे हे “शासकीय विद्युत ठेकेदार असुन त्यांचा परवाना क्र. 212310020515062020 असून परवाना अद्याप अधिकृत आहे. सौ. दिपाली सागर टिळेकर यांनी तक्रारदार यांना नवीन वीज मीटर मांडणी करण्याचे काम गट नंबर 344 येलवाडी भंडारा रोड, ता. खेड, जि. पुणे 410501 येलवाडी या गटाचे दिले होते. तक्रारदार संबंधीत सर्व कागदपत्रे घेवून त्याभागातील महावितरण कंपनीचा वायरमन श्री. गजानन चट्टे यांना तक्रारदार ससाणे यांनी त्यांच्या मोबाईल क्रमांक 8180016969 या वरून दि. 04/06/2026 रोजी सायंकाळी 06.00 वा. 7875762458 या क्रमांकावर फोन केला. लोकसेवक यांनी तक्रारदार यांना साईराज चौक येलवाडी येथे भेटण्यासाठी बोलाविले तक्रारदार यांनी त्यांच्याकडे असलेले सौ दिपाली टिळेकर यांचे नवीन वीज मिटर मांडणी करण्याचे कामाचे सर्व पेपर सिनियर टेकनिशियन चट्टे यांना सर्वे करण्यासाठी दाखविली. लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे त्याठिकाणच्या सर्व आकरा प्लॉटचे मिळुन दोन लाख रूपये नवीन विज मिटर मांडणी करण्यासाठी लागतील अशी लाचेची मागणी केली. लोकसेवक यांनी मागीतलेली रक्कम सुरक्षा ठेव व्यतिरिक्त असल्यामुळे ही लाचेची मागणी आहे असे तक्रारदार यांच्या लक्षात आले. तक्रारदार यांची लाच देण्याची कुठल्याही प्रकारची इच्छा नसल्यामुळे त्यांनी स्वखुशीने लाप्रवि, कार्यालयामध्ये दिंनाक 05/06/2026 रोजी लेखी तक्रार दिली.” त्या तक्रारीवर आम्ही व पंच साक्षीदार यांनी वाचून त्यावर सहया केल्या.

तक्रारदार श्री. ससाणे यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.05/06/2026 रोजी पडताळणी कारवाई करणेचे ठरले व त्यानंतर तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार श्री. ससाणे यांचेकडे येलवाडी येथील सिनिअर टेकनिशीयन श्री चट्टे हे लाच मागणी करतात अगर कसे या पडताळणी करीता सोनी कंपनीच्या काळ्या रंगाच्या शासकिय व्हॉईस रेकॉडर मध्ये ई व्ही एम कंपनीचे 32 जीबी क्षमतेचे सिलबद पॅकिंगमधील मेमरीकार्ड काढले त्याची आम्हा पंचाचे समक्ष पाहणी केली असता त्याचे एका बाजुस. EVM Elite 32 GB MicroSD HC I व मागील बाजुस EETF32GKN0225 अशा वर्णनाचे टाकुन तक्रारदार श्री.ससाणे यांचे निवेदन घेऊन त्यापाठोपाठ पंच क्र. 1 व 2 यांचे निवेदन घेतली ती वेळ 15.10 वा.ची होती. सदर निवेदन घेतेवेळी



Scanned with CamScanner

8 जीबी क्षमतेचे सिंलबद पॅकिंगमधील मेमरीकार्ड काढले त्याची आम्हा पंचाचे समक्ष पाहणी केली असता त्याचे एका बाजुस M ROCK 32 GB C10 MicroSD HC I व मागील बाजुस MR-XY1/26 CE MMCO8AX215F-TO DLD XY 2601 MADE IN TAIWAN असे वर्णनाचे मेमेरी कार्ड मोबाईल मध्ये टाकुन पंचासमक्ष व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले आहे. त्यानंतर पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने तक्रारदार दोन्ही पंच व सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या. लोकसेवक यांना भेटण्याची जागा विचारण्यासाठी तक्रारदार यांना त्यांचे मोबाईल क्रमांक 8180016969 प्रथम व्हाईस रेकॉर्डर लावून लोकसेवक यांना त्यांचे मोबाईल क्रमांक 7875762458 या वर संपर्क साधला त्यावेळेस तक्रारदार यांना लोकसेवक यांनी साईराज चौक येलवाडी येथील चौकात बोलाविले. तक्रारदार यांचे चार चाकी वाहन हुडयाई कंपनीची औरा MH14KS9978 या गाडीने त्यांना व्हाईस रेकॉर्डर चालू करून तो तक्रारदार श्री. ससाणे यांना लावला व पंच क्र.01 श्री. गोरे यांचेसह पडताळणीकामी तक्रारदार यांना साईराज चौक येथे रवाणा केले ती वेळ 15.30 वा ची होती.

त्यानंतर थोडया वेळाने तक्रारदार व पंच हे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले त्यावेळी पोहवा/3296 गदादे यांनी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ 15.48 वा ची होती. त्यावेळी मी तक्रारदार यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की, "मी व पंच क्र.1 श्री.गोरे असे साईराज चौक येथे गेलो असता लोकसेवक यांनी त्यांचे मोबाईल क्रमांकवर फोन केला त्यांनी तिथून तक्रारदार यांना सांगुर्डी फाटा येथे बोलाविले तिथे तक्रारदार गेल्यावर सिनिअर टेकनिशीयन लोकसेवक चट्टे हे तक्रारदार यांच्या कार मध्ये बसले त्यावेळेस ते तक्रारदार यांना झाल का बोलन..त्यांच्या सोबत त्यावर तक्रारदार म्हटले झालय ना.. तेवढयात लोकसेवक यांना अननोन कॉल अला असता तक्रारदार यांनी लोकसेवक यांना विचारले नवीन नंबर काय? त्यावेळेस लोकसेवक यांनी नंबर ऑफिसच्या मॅडमचा असल्याचे सांगितले. तक्रारदार यांनी लोकसवेक यांना बरं कस करायचं काय? असे विचारता लोकसेवक चट्टे तक्रारदार यांना म्हणाले दोन तीस सांगा त्यांना त्यावर तक्रारदार ससाणे लोकसेवकांना म्हणाले तुम्ही त्या दिवशी दोन लाख म्हटले...ना आता..त्यावर लोकसेवक श्री चट्टे तक्रारदार यांना नाय दोन वीस...दोन वीस म्हटल होत...तुम्हाला..मी तुमच्या हिशेबाने सांगितले होते....वीस ...तीस तुम्हाला राहतील हया हिशोबाने त्यावर तक्रारदार ससाणे लोकसेवकांना माझ काय नको तुमचंच... असे म्हणता लोकसेवक श्री चट्टे यांनी तक्रारदार यांना दोन वीसच बोलल होतो...मी मग दोन...असे म्हणाले त्यावर तक्रारदार श्री ससाणे लोकसेवक यांना दोन का? असे विचारता लोकसेवक चट्टे हा...असे म्हणाले त्यावर तक्रारदार ससाणे यांनी लोकसेवक यांना कमी काय? असे विचारता लोकसेवक चट्टे अहो...अडीच लाख असे म्हणाले तक्रारदार ससाणे यांनी लोकसेवकांना ते काय म्हणतेत एकच कनेक्शनय माझं असे म्हणता लोकसेवक चट्टे यांनी एकच...परत बाजूला पण एक ये...ओ असे सांगून इतर इसमाला फोन लावला व सदर कनेक्शन बाबत खात्री केली. लोकसेवक चट्टे यांनी तक्रारदार यांना पण ते तुम्हाला नाय....व्यवस्थित सांगितलेय खरचं नको मी अस करत नाय बरका म्हणजे मला माहिती त्यांना गरज शाळा चालू होणारय मग सांगा की पण जे मी तुम्हाला योग्य तेच सांगितले तुम्हाला ते अडीच पण देईल तुम्ही ते घ्या पाहून असे म्हणटले त्यावर तक्रारदार यांनी हा...(हसत)...मला नको मला रुपया नको त्यावर तक्रारदार ससाणे यांनी लोकसेवक यांना दोन फायनल म्हणताय... दोन लाख असे म्हणता लोकसेवक चट्टे यांनी हं... असे म्हणले. सदर वेळी लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्या कडे दोन लाख रुपये लाच मागणी केली. त्यानंतर मी पंच क्र.01 गोरे यांना गेले पासुन येई पर्यंत काय झाले याबाबत विचारणा करता पंच क्र.01 गोरे यांनीही तक्रारदार यांचे प्रमाणे मिळती जुळती हकिकत सांगितली. त्यानंतर मी पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकले असता ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली असता सदर पडतळणी वेळी तक्रारदार यांना मिळालेल्या नविन विज मिटर मांडणी कामासाठी दोन लाखाची लाच मागणी केलेचे निष्पन्न झालेने तक्रारदार यांना लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी सांगितले की, माझ्याकडे बचतीच्या खर्चातील फक्त पन्नास हजार रुपये शिल्लक असून मी तेवढेच सादर करु शकतो. असे सांगून पंन्नास हजार रोख रुपये लाच रक्कम म्हणून सादर केली. लोकसेवक यांनी लाच मागणी केल्याचे निष्पण झाल्याने सापळा पुर्व व सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. तक्रारदार यांनी त्यांचेकडील 50,000/- रुपये हजर केलेने सदर नोटांचे नंबर पंच क्रमांक 1 यांच्या मदतीने कागदावर लिहुन काढले त्यावर आम्ही व दोन्ही पंचांनी सहया केल्या.

त्यानंतर आम्ही अँन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगुन तक्रारदार यांनी सादर केलेल्या भारतीय चलनातील 500 रुपये दराच्या शंभर नोटा व भारतीय चलणी नोटासारख्या दिसणा-या खेळण्यातील तिनशे नोटा अश्या एकूण दोन लाख दराच्या नोटांना अँन्थ्रासीन पावडर लाऊन नोटा खाकी रंगाच्या लिफाफयात ठेवून नोटांचा लिफाफा चौकोनी चॉकलेटी रंगाच्या, चैन असलेल्या, त्यावर एका बाजुला इंग्रजीमध्ये MOHINI By DILIP SONIGARA @ Chapekar Chowk, Chinchwadgaon mohinibydilipsonigara f Mohini.Jewels.India



Scanned with CamScanner

Mohini Jewels 96658 36664 व दुस--या बाजुला DILIP SONIGARA JEWELLERS या चैनवाल्या पिशवी मध्ये ठेवली. सापळा कारवाई करीता सोनी कंपनीच्या काळया रंगाच्या शासकिय व्हॉईस रेकॉडर मध्ये EVM Elite 32 GB MicroSD HC I व मागील बाजुस EETF32GKN0225 अशा वर्णनाचे मेमरी कार्ड असलेल्या रेकॉर्डमध्ये सापळा कारवाईचे अनुषंगाने प्रथम तक्रारदार ससाणे त्यानंतर दोन्ही पंचांचे निवेदन घेतले ती वेळ 17.18 वा ची होती. सदर वेळी व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले आहे. त्यावेळी मी तक्रारदार पंच व सापळा पथक यांना योग्य त्या सुचना देऊन तक्रारदार यांना व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन लाऊन देऊन पंच क्र.1 गोरे यांचेसह तक्रारदार यांचे दु चाकी MH14NG9930 मधुन रवाना केले ती वेळ 18.22 वा ची होती. त्यांचे पाठोपाठ सापळा पथक व पंच क्र.02 असे रवाना झाले व भैरवनाथ चौक येथे काही अंतरावर शासकिय वाहन कोणास संशय येणार नाही अशा प्रकारे थांबून होते. थोडया वेळाने तक्रारदार यांनी लाच रक्कम स्विकारलेबाबत पुर्व नियोजीत इशारा केला.

त्यानंतर मी व सापळा पथक भैरवनाथ चौक येथील बिकानेर स्विटच्या समोरील रामकृष्ण मेडीकल जवळ गेलो त्यावेळी मपोशि माकर यांनी तात्काळ कॅमेरामध्ये चित्रीकरणास सुरुवात केली. त्यानंतर तक्रारदार ससाणे यांना लावण्यात आलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर पोहवा/3296 गदादे यांनी आमचे सुचनेप्रमाणे काढून बंद केला ती अंदाजे वेळ 18.32 वा.ची होती. त्यानंतर लोकसेवक चट्टे यांचे दोन्ही हात पोहवा गदादे यांनी पकडले व त्यांना ताब्यात घेतले. त्यानंतर तक्रारदार यांना लोकसेवक चट्टे यांनी स्विकारलेली लाच रक्कम कुठे ठेवली आहे असे विचारले असता तक्रारदार यांनी सांगितले की, लोकसेवक चट्टे यांनी स्विकारलेली लाच रक्कम त्यांचे ताब्यातील दुचाकी MH14MG8820 गाडीच्या डिक्कीमध्ये लाच रक्कम ठेवल्याचे सांगितले. त्या वेळेस लोकसेवक यांना विचारता त्यांनी देखील लाच रक्कम त्यांचे गाडीच्या डिक्कीमध्ये असल्याचे सांगितले. त्यानंतर पंचासमक्ष लोकसेवक चट्टे यांचे गाडीच्या डिक्कीची तपासणी केली असता त्यामधे लाच रक्कम आढळुन आली. माझ्या सुचनेप्रमाणे पंच क्र. 02 श्री.उबाळे यांनी लाचेची रक्कम ताब्यात घेवून मोजली असता ती रुपये 2,00,000/- असल्याचे दिसून आले. त्यानंतर सदर नोटांचे सापळापुर्व कारवाई दरम्यान कागदावर लिहून ठेवलेल्या नोटांच्या नंबरशी खात्री केली असता तंतोतंत जुळून आले. त्यानंतर लोकसेवकास त्याचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री गजानन बाळासाहेब चट्टे वय-35 वर्षे व्यवसाय नोकरी पद- सिनीअर टेक्नीशिअन रा. मिडास रिजनशी फलॅट नं 609, विठ्ठलवाडी देहू बाय पास रोड देहूगाव, ता. मावळ जि.पुणे मुळ राहणार मु.पो.हट्टा ता. वसमत, जि. हिंगोली. असे सांगितले. त्यानंतर मी लोकसेवक सिनिअर टेकनिशियन चट्टे यांचे रामकृष्ण मेडीकलच्या बाजूस असलेल्या बंद दुकानाच्या आड कृत्रीम अंधार करुन, अल्ट्राव्हॉयलेट दिव्याच्या सहाय्याने प्रथम सापळा पथकातील अधिकारी/अंमलदार यांचे हात व कपडयांची तपासणी केली असता कोठेही अँन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली नाही. त्यानंतर पंच क्र.2 श्री.उबाळे यांचे हातास अँन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली कारण त्यांनी सापळा यशस्वी झालेनंतर लाच रक्कम लोकसेवक यांचे दुचाकी गाडीच्या डिक्कीतून ताब्यात घेतली होती. ताब्यात घेतलेली लाच रक्कम अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात पाहिली असता त्यावर देखील फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली. तसेच तक्रारदार यांच्या उजव्या हातावर देखील अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात पाहिली असता त्यावर देखील फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली.

तसेच तक्रारदार श्री ससाणे व पंच क्र.01 यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी सांगितले की, मी पंच क्र.1 गोरे यांचेसह भैरोवनाथ चौक देहूगाव येथे जाऊन त्यांची भेट घेतली असता तक्रारदार ससाणे लोकसेवक चट्टे यांना फोनवर म्हणाले हॅलो थांबलोय भैरवनाथ चौकात अं ते काय रामकृष्ण मेडीकल तिथ थांबलोय या या तक्रारदार ससाणे कुठ गेल ते ऑफिसला गेल ते असे म्हणता लोकसेवक चट्टे यांनी तक्रारदार यांना पुढे या तक्रारदार ससाणे लोकसेवक यांना हा . का लोकसेवक चट्टे यांनी तक्रारदार यांना किती येत असे विचारले त्यावर तक्रारदार ससाणे यांनी लोकसेवक चट्टे यांना दोन ये हा पेपर ये सही करुन असे म्हणुन तक्रारदार यांनी त्यांच्या उजव्या हाताने लोकसेवक गजानन चट्टे सिनीयर टेकनिशियन यांच्या उजव्या हातात लाचेच्या रक्कमेची पिवशी दिली. पिशवीवर चौकोनी चॉकलेटी रंगाच्या, चैन असलेल्या, त्यावर एका बाजुला इंग्रजीमध्ये MOHINI By DILIP SONIGARA @ Chapekar Chowk, Chinchwadgaon mohinibydilipsonigara f Mohini.Jewels.India Mohini Jewels 96658 36664 व दुस--या बाजुला DILIP SONIGARA JEWELLERS लिहीलेली पिशवी त्यामध्ये खाकी रंगाचा लिफाफा व पेपर दिला असता, लोकसेवक चट्टे यांनी पिशवीतील पेपर हातात काढून घेतले व खाकी रंगाचा लाचेचा लिफाफा त्यांच्या दुचाकी गाडीच्या डिक्कीमध्ये ठेवला व पिशवी देखील गाडीवर ठेवली. त्यावेळेस लागलीच तक्रारदार यांनी पुर्व नियोजित इशारा केला. अशा आशयाची हकिकत तक्रारदार व पंच क्रमाक 1 यांनी सांगितली सदर बाबत सविस्तर पंचनामा करणेत आला आहे.



Scanned with CamScanner

तरी तक्रारदार श्री. तानाजी रामचंद्र ससाणे यांनी दि.05/06/2026 रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.05/06/2026 रोजी 15.30 वा ते 15.48 वा चे दरम्यान करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार श्री. ससाणे यांचेकडे ते शासकीय अधिकृत विद्युत ठेकेदार असून, त्यांचा परवाणा क्रमांक 2123100205150620 20 असा असताना, त्यांचेकडे सौ दिपाली सागर टिळेकर यांनी तक्रारदार यांना नवीन विज मिटर मांडणी करण्याचे काम दिले असताना, सदर कामासंबंधी तक्रारदार यांनी दिंनाक 04/06/2026 रोजी सिनियर टेकनिशियन लोकसेवक गजानन बाळासाहेब चट्टे यांना भेटून त्यांच्याशी सदर कामाबाबत चर्चा केली असता लोकसेवक चट्टे यांनी तक्रारदार यांच्याकडे एकूण 11 नवीन वीज मिटर मांडणीकरण्यासाठी दोन लाख रुपये दयावे लागतील असे म्हणून तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केली. तसेच दिंनाक 05/06/2026 रोजी लोकसेवक चट्टे यांनी त्यांच्या मोबाईल क्रमांक 7875762458 वरुन तक्रारदार यांना त्यांचे मोबाईल क्रमांक 8180016969 वर लाचेची रक्कम स्विकारण्यासाठी भैरवनाथ चौक येथे बोलावून रामकृष्ण मेडीकल स्टोअर्सच्या जवळ त्याचे ताब्यातील गाडी क्रमांक MH14MG8820 सुझुकी एक्सेस या गाडीच्या डिक्कीत स्विकारलेली लाचेची रक्कम मिळून आली. म्हणून लोकसेवक गजानन बाळासाहेब चट्टे वय 35 वर्षे नोकरी पद- सिनीअर टेक्नीशिअन रा. मिडास रिजनशी फलॅट नं 609, विठ्ठलवाडी देहू बाय पास रोड देहूगाव, ता. खेड जि.पुणे मु.पो.हट्टा ता. वसमत, जि. हिंगोली यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलम 7 प्रमाणे कायदेशीर फिंयाद आहे.

माझा वरील फिंयादी जबाब माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

दाखल अधिकारी:- पोहवा 1506 माने
तपास अंमलदार:- पोनि पाटील, ला.प्र.वि पुणे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
AKSHAY ANANT JADHAV
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): PSI
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with CamScanner

पोलीस ठाणे अमलदार

Registered by (नोंदणी अधिकारी)

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): VIKRAM SHAHEBRAC
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): PI

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):



Scanned with CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**



Scanned with CamScanner